I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 381-388
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# असंघटित क्षेत्रातील महिला शेतमजूरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास

डॉ. जे.एस. मोहितकर

ज्यु. कॉलेज लेक्चरर
डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर

| Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022<br>Accepted :25.03.2022 | Published: 01.04.2022 |
|---|---|---|

**संदर्भ :**

भारतीय अर्थव्यवस्थेतील असंघटीत क्षेत्रात काम करणारी लोकसंख्या मोठया प्रमाणावर आहे. अशाच क्षेत्रातील महिला शेतमजुर ही सुध्दा एक महत्वाचा घटक आहे. त्याच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास या शोधनिबंधात घेतला आहे. शेतमजूर महिलांचे कामांचे दर पुरुष मजुरापेक्षा कमी आहे. समान काम करित असतानासुध्दा हे दर कमी दिसुन येतात. शिक्षणाचा प्रसार झाला असतांना त्यांच्या शिक्षणचे प्रमाण कमी आहे. त्यांचा आरोग्याचा प्रश्न आहे. हे सर्व जाणुन घेण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात आहे. यात महिला शेतमजुराच्या कामाची विभागणी, त्यांचा वयोगट, अल्प मजुरी दर, कर्जबाजारीपणा, ग्रामीण उद्योगधंद्याचा ऱ्हास, बेकारी व अर्धबेकारी, त्यांचे बचतीचे प्रमाण, शैक्षणिक स्थिती, आरोग्य, व्यसनाधिनता, त्यांच्यातील संघटनेचा अभाव इत्यादी घटकांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. यात शासनाच्या उपाययोजना उदा. राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, ई–श्रमिक कार्ड यांचे स्वरुप व माहिती तसेच अभ्यासावरुन संशोधनात आलेले निष्कर्ष व शिफारसी मांडण्यात आल्या आहे. एकंदरीत शेतमजुर महिलांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थतीचा अभ्यास करण्याचा उद्येशाने या विषयाची निवड केली आहे.

**बिजशब्द** — भारतीय अर्थव्यवस्था, असंघटीत क्षेत्र, ग्रामिण उद्योग, मजरांची सौदाशक्ती.

**प्रस्तावना:**

भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रामुख्याने तीन महत्वपूर्ण क्षेत्र आहे. शेती, उद्योग, सेवा यापैकी प्राथमिक क्षेत्रात येणारा घटक शेती, म्हणून शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आधुनिक काळात औद्योगिकरण व यांत्रिकीकरण झाले असले तरी आजही जवळपास ६० ते ६५ टक्के जनता ग्रामीण किंवा खेड्यात राहणारी आहे. त्यांच्या उपजिविकेचे साधन शेती आहे. अशा या महत्वपूर्ण क्षेत्राशी शेतकरी आणि शेतमजूर  हा घटक निगडीत आहे, परंतु या क्षेत्रात काम करणारा मजूर वर्ग हे असंघटित क्षेत्रात येतात. ज्यांन नियमित वेतन, भविष्यनिर्वाह निधी आणि सामाजिक सुरक्षा यासह इतर लाभसुध्दा मिळत नाही.

असंघटीत क्षेत्रात काम करणारा महत्वाचा घटक म्हणजे शेतमजूर यानुसार शेतमजूराची व्याख्या खालील अर्थाने केली जाते.

'इतरांच्या शेतीमध्ये कृषीविषयक कामे रोजंदारी तत्वावर करण्यासाठी जाणारे मजूर म्हणजे शेतमजूर'

"Agriculture laborer are those person, who work on the land of others o wages for the major art of year"

आधुनिक काळात शेतीचे विभाजन व तुकडीकरण मोठया प्रमाणावर झाल्यामुळे शेतमजूराचे दोन गटात विभाजन झाले.

**१) भूमिधारी शेतमजूर:—**

ज्यांच्याकडे शेती आहे परंतु शेती कमी असल्यामुळे ते दुसऱ्याच्या शेतावर मजूरीने काम करते असे मजूर म्हणजे भूमिधारी शेतमजूर.

**२) भूमिहीन शेतमजूर:—**

ज्यांना स्वत:च्या मालकीची जमीन नाही ते उपजिविकेसाठी दुसऱ्याच्या जमिनीवर परिश्रम करतो असे मजूर म्हणजे भूमिहीन शेतमजूर.

लिंगभेदानुसार या शेतमजूरात पुरूष शेतमजूर व महिला शेतमजूर असे दोन प्रकार शेतीक्षेत्रात जेवढे महत्व पुरूष शेतमजूराचे आहे. म्हणजे पुरूषमजूर जेवढी कष्टाची कामे करतात. तेवढीच किंबहुना त्याहीपेक्षा अधिक कामे महिला शेतमजूर करतात. परंतु अर्थव्यवस्थेत हा घटक मात्र उपेक्षित आहे. भारतात अर्थाजन करणाऱ्या महिलांपैकी जवळपास ७० टक्के महिला या शेतीक्षेत्रात काम करतात. शहरी भागात ज्या कुटूंबात बऱ्यापैकी उत्पन्न मिळत असेल तर त्या घरातील महिला काम करित नाही. परंतु ग्रामीण भागात ८० टक्के महिला या शेतात काम करण्यासाठी जातात. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीक्षेत्रात महिलांचे स्थान महत्वाचे आहे.

महिला शेतमजूर अहवाल सन १९५०—५१ नुसार, शेतमजूर कुटूंबाची संख्या १७९ यापैकी ५९ टक्के कुटूंबाजवळ शेती नव्हती, १०.९० टक्के कुटूंब करार

I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 381-388
A Double-Blind Peer Reviewed Journal
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

कयन शेती करीत हेते तर ८१.१० टक्के कुटूंब रोजंदारीवर काम करीत होते.

दुसऱ्या शेतमजूर चौकशी समितीचा अहवाल (१९५६–५७) शेतमजूर कुटूंबची संख्या १६३ लक्ष होती त्यापैकी ५७ कुटूंबात जमीन नव्हती, २७ टक्के कुटूंब करारानुसार शेती करीत होते तर ७३ टक्के कुटूंब रोजंदारीवर काम करीत होते.

१९५६–५७ च्या अहवालानुसार ३.३ कोटी शेतमजूर त्यापैकी १.२ कोटी पुरूष तर १.८ कोआी महिला व ३० लाख मुले शेतमजूर होती यावरून महिलांची संख्या पूर्वीपासूनच मोठ्या प्रमाणात होती हे लक्षात येते. (संदर्भ: श्रमाचे अर्थशास्त्र)

कारखान्यात काम करणाऱ्या महिलांचे बाबतीत स्वयंचलित यंत्र चालविण्यासाठी स्त्री कामगार असमर्थ आहे. तसेच गुंतागुंतीचे कार्य जाणीवपूर्वक समजून घेऊन नंतर ते कौशल्याने करण्याची प्रवृत्ती महिला कामगारांमध्ये नसते असे गैरसमज आहे. परंतु महिला शेतमजूराबाबत या गोष्टी लागू होत नाही. शेती क्षेत्रात यांत्रिकीकरणाचा वापर कमी असल्यामुळे मानवी संसाधनाच मोठया प्रमाणावर वापर होतो. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे दळण, कांडण, पाणी भरणे, चुलीचा वापर यासारख्या कामात महिलांचे परिश्रम काही प्रमाणात कमी झाले आहे. चूल आणि मूल एवढयापुरतच मर्यादित न राहता स्त्रीयांच क्षेत्र व्यापक झालं आहे. तरीपण शेतमजूर महिलांच्या अनेक समस्या आहेत. या अनुषंगाने त्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थीचा अभ्यास पुढील प्रमाणे पाहता येईल.

**दैनंदिन कामाची विभागणी:**

तुलनात्मकदृष्टया पाहिले तर महिला शेतमजूराच्या कामाचे स्वरूप पुरूष शेतमजूराच्या कामाच्या स्वरूपापेक्षा व्यापक आहे. पुरूषांच्या तुलनेत महिलांना अधिक कामे करावी लागतात. सकाळी कोंबडा आरवल्यापासून तर रात्री अंथरूणावर पाठ लागेपर्यंत जवळपास १५ ते १६ तास काम करीत असतात.

कामाचे स्वरूप

| पुरूष शेतमजूर | महिला शेतमजूर |
|---|---|
| नांगरणी, वखरणी, पेरणी, कापणी, मळणी, जमाबांधणी, फवारणी, गुरे राखणे, माल भरणे, दूध काढणे, शेतात जाणे. | पेरणी, निंदण/खुरपणी, कापणी, देखभाल, बांधणी, निवडणे, श्रेणीकरण, मिरची तोडणे, धानाची लावणी, झाडांना खत देणे, कापूस वेचाई, शेतमाल धुणे, वाळवणे, भरडणे, पाखडणे, साठवण करणे, दूधदूभते, मुलांचे संगोपन, देखभाल, चारा आणणे, सरपणाची व्यवस्था, वृध्दांची देखभाल इत्यादी. |

वरील वर्गीकरणावरून लक्षात येते की, शेमजूर महिलांना दुहेरी भूमिका निभवावी लागतू, अक्षरश: तारेवरची कसरत करवी लागते.

**महिला शेतमजूरांचा वयोगट:**

महिला शेतमजूर हे विशिष्ठ वयोगटातील नसतात तर लहानापासून तर वयोवृध्दापर्यंत काम करणाऱ्या महिला आहे. २०११ च्या जनगणना अहवालानुसार महिला शेतमजूराची आकडेवारी इथे देत आहे.

वरील तक्ता क्र. १ वरून लक्षात येते की, प्रत्येक वयोगटातील स्त्री किंवा मुलगी ही तिच्या क्षमतेनुसार शेतीशी निगडीत कामाशी संलग्न आहे. महिलांचे काम हे तिच्या वयावर अवलंबून नसून शारिरीक क्षमतेवर अवलंबून आहे.

**महिला शेतमजूरांच्या आर्थिक समस्या:**

**अल्प मजूरी दर:–**

एका शासकीय अहवालानुसर भारतातील शेतमजूराचे दरडोई उत्पन्न १९७१ मध्ये ४.२८ रू. होते ते १९९४ मध्ये २६.८० रू. एवढे झाले त्यानंतर मजूरी दरात बदल झाले परंतु देशातील वाढती महागाई लक्षात घेता आजही मजूरीचा दर कमी आहे. भारतात किमान वेत कायदा १९४८ मध्ये केला. आताच आपण मजूरी दर लक्षात घेतला तर महाराष्ट्र न्यूनतम वेतन दर २०२१ नुसार खालील आकडेवारी आहे.

वरील आकडेवारी नुसार मजूरीदर लक्षात घेता कुशल मजूरीच्या वेतनदरापेक्षा अकुशल मजूरीचा दर हा कमी आहे. आज प्रत्यक्ष पाहणीनुसार महिला शेतमजूराचे मजूरीचे प्रमाण व कामाचे तास खालील प्रमाणे

प्रत्यक्ष पाहणी

| वेळ | कामाचे तास | रोज | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| ११.०० ते ५.०० | ६ तास | १५० | ४० टक्के |
| ८.०० ते ५.०० | ९ तास | २०० | ६० टक्के |

प्रत्यक्ष पाहणी आणि महाराष्ट्र न्यूनतम वेतन दर लक्षात घेता महिला शेतमजूरांचा मजूरीचा दर कमी आहे. त्यांना १५० ते २०० रू. यापेक्षा जास्त मजूरी मिळत नाही त्यामुळे त्या आपल्या कुटूंबाच्या सर्व प्रकारच्या गरजा

भागवू शकत नाही पर्यायाने राहणीमानाचा दर्जा निकृष्ठ आहे.

**कर्जबाजारीपणा:**

शासकीय अहवालानुसार एकूण शेतमजूरापैकी जवळपास ४४ टक्के शेतमजूर हे कर्जबाजारी आहेत. शेतमजूराच्या उत्पन्नातून त्यांच्या दैनंदिन गरजा भागल्या जातात, परंतु जर एखाद्या वेळेस आजार असला किंवा कार्यक्रम असला तर त्यांना कर्ज काढावे लागते.

भारतीय समाज हा अंधश्रध्दा आणि रूढी व परंपरेने जखडला असल्यामुळे प्रत्येक कार्य हे परंपरेनुसार झाले पाहिजे अशी समज आहे. अशावेळेस त्यांच्या उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असतो. तेव्हा ते ऋण काढून सण साजरे करतात. त्यामुळे कर्जबाजारीपणा वाढतो.

आज बचत गटाची संकल्पना रूजली आहे. तरीपण सावकारी कर्जाचे प्राबल्य आहेच.

**बेकारी व अर्धबेकारी:**

शेतीक्षेत्रात छूपी/ प्रच्छन्न बेकारी मोठया प्रमाणात दिसून येते. या क्षेत्रात आवश्यकतेपेक्षा अधिक लोकांना सामावून घेण्याची क्षमत असल्यामुळे वर वर पाहता शेतमजूर काम करित असले तरी अप्रत्यक्षपणे ते बेकार असतात तसेच महिला शेतमजूरांना वर्षभर काम मिळत नाही वर्षातून ६ ते ७ महिनेच काम करतात. आपली कृषीव्यवसाि अजूनही बऱ्याच प्रमाणात निसर्गावर अवलंबून असल्यामुळे तसेच सिंचनाच्या सोयी कमी यामुळे बेकारीची परिस्थिती निर्माण होते.

**ग्रामीण उद्योगधंद्याचा ऱ्हास:**

ग्रामीण भागात शेतमालाची निर्मिती केली जाते परंतु कच्च्या मालाचे पक्कया मालात रूपांतर करणाऱ्या लघू किंवा कुटीर उद्योगाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे उत्पन्नात वाढ होत नाही. आर्थिक उलाढाल वाढविण्यासाठी शेतीबरोबर उद्योगाचाही विकास आवश्यक आहे. याला अनुसरून राष्ट्रसंतांची अर्थव्यवस्था मजबूत करणारी रचना महत्वाची वाटते.

कच्चा माल मातीच्या भावे। तो पक्का होता चौपटीने घ्यावे।

मग ग्रामजन कैसे सुखी व्हावे? पिकवोनि ते उपाशी।।

वरील ओवीमधुन शेतीक्षेत्रातील वास्तव परिस्थिती लक्षात येते. आज राष्ट्रसंतांच्या विचाराप्रमाणे शेतकरी व शेतमजूर धान्य पिकवूनही उत्पन्न मात्र वाढवू शकत नाही. शहरी भागात यंत्राचे प्रमाण वाढल्यामुळे गावातील उद्योगजकता कमी झाली. कुशल कामगारांचे स्लांतरण झाल्याने ग्रामीण भागातील उद्योगधंद्याचा ऱ्हास झाला. तयार मालाची किंमत ही कच्च्या मालाच्या तुलनेत वरील ओवीप्रमाणे चौपट असते हे आपल्याही अवलोकनात दिसून येते. म्हणून शेतीचे उत्पादन वाढूनही वाढत्या महागाईनुसार उत्पन्न वाढले नाही.

**मोठया शेतकऱ्यांचा विरोध:**

शेतमजूर महिलांची मजूरी वाढल्यास आपल्याला होणारा नफा कमी होईल असे मोठया शेतकऱ्यांना वाटत असल्यामुळे मोठे शेतकरी शेतमजूर महिलांच्या वाढत्या मजूरीदराला विरोध करतात. बऱ्या शेतमजूर महिला व भूमिहीन असल्यामुळे त्यांना दुसऱ्याच्या शेतीवर काम केल्याशिवाय त्यांची व त्यांच्या कुटूंबाची उपजिविका होत नाही. त्यांना दुसरा र्प्याय नसतो आणि कामाच्या तासात पाहीजे त्या प्रमाणात काम निघत नसल्याने मजूरी दर वाढविण्यास शेतकरी तयार नसतात.

शेतमालाला खर्चावर आधारित भाव मिळत नसल्यामुळे वाढतया मजुरीदराली ते विरोध करतात.

**बचत:**

उपभोगखर्च भागविल्यानंतर भविष्यकाळासाठी जी रक्कम ठेवली जाते ती बचत शेतमजूर महिलांचे उत्पन्न कमी त्यामुळे त्यांचा बचतीचा दर की कमी असतो हे प्रत्यक्ष पाहणीवरून लक्षात आले. शेतमजूर महिला जास्तीत जास्त बचत गटात सहभागी होवून आपली बचत करतात म्हणून ग्रामीण भागात स्वयंसहाय्यता गट हे बचतीच्या दृष्टीने चांगले कार्यरत आहे.

तक्ता क्र. ३ नुसार साधारणत: १०० रू मासिक बचत करणाऱ्या महिला या ४० टक्के आहे. तर २०० रू. बचत करणाऱ्याचे प्रमाणे ३२टक्के आहे आणि कुठेच बचत न करणाऱ्या महिला या १६ टक्के आहे. शेतमजूर महिला या आपल्या मर्यादित क्षेत्राच्या बाहेर जात नसल्याने त्या बॅक किंवा पोस्ट यात बचत करताना आढळून आल्या नाही. फार कमी महिला इथे बचत करतात.

**सामाजिक समस्या:**

**निरक्षरता व अज्ञान:**

शेतमजूर महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. बऱ्याच महिला अल्पशिक्षीत आहे. त्यामुळे त्यांची वैचारिक पातळी कमी आहे. आजही शेतमजूर महिलामध्ये मुलींनी जास्त शिकून काय करायचे या विचाराच्या आहेत. तसेच मुलगी म्हणजे एक जबाबदारी अशा प्रकारचे अज्ञान त्यांच्यात आहे. त्यामुळे मुलींचे कमी वया लग्न होता आणि शिक्षण सोडून कामाला लागतात. त्यांचे शिक्षणाचे प्रमाण तक्ता क्र. ४ मध्ये.

वरील तक्त्यावरून निर्देशनास येते की, या क्षेत्रात जास्त प्राथमिक शिक्षण घेतलेल्या ४४ टक्के माध्यमिक शिक्षण घेतलेल्या ४० टक्के तर १६ टक्के अशिक्षित असे

आढळून आले. आता शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे अशिक्षित महिलांचे प्रमाण कमी झाले आहे. तरीपण उच्च माध्यमिक किंवा पदवी घेतलेल्या स्त्रिया अजूनही नाही.

**शेतमजूर महिलांचे आरोग्य:**

भारतातल्या दर दोन महिलामध्ये एक महिला कसल्या ना कसल्या आजाराने ग्रस्त आहे. असा आरोग्यविषयक अहवाल सांगतो. या महिला जास्तीत जास्त ॲनिमियाच्या पेशंट आहे. कमी उत्पन्न, आरोग्यविषयी अजागृकता यामुळे पाहिजे त्या प्रमाणात आरोग्याची काळजी घेत नाही. त्या शरिरापेक्षा कामाला महतव जास्त देतात. वेळेवर वेदनाशामक गोळया घेऊन वेळ निभावून नेतात. अशावेळेस प्रतिकारशक्ती कमी असल्यामुळे एखादा आजार बळावला तर त्यावर मात करता येत नाही. शारिरीक व्याधी व कमी उत्पन्न यामुळे त्यांचे जीवन म्हणजे तारेवरची कसरत असते. बऱ्याच ठिकाणी ग्रामीण भागामध्ये डॉक्टरांचा अभाव असल्यामुळे त्या उपचारासाठी खालील ठिकाणी जातात.

वरील तक्त्यावरून लक्षात येते की, जास्तीत जास्त महिला या आशा वर्कर कडे जातात. सरकारच्या योजनेनुसार प्रत्येक गावात लोकसंख्येनुसार आशा वर्कर दिल्या जाते. शेतमजूर महिला या गावातून दूर जाण्यासाठी सहजासहजी तयार होत नाही. आशा वर्कर ही गावातीलच महिला असल्यामुळे सर्वात पहिले त्यांच्याकडे जातात. म्हणून यांच प्रमाण ७० टक्के आहे. प्राथमिक आरोग्यकेंद्रात २० टक्के तर खाजगी दवाखाण्यात १० टक्के जातात.

**व्यसनाधिनता:**

शेतमजूर महिलांच्या कुटूंबात व्यसनाधिनतेचे प्रमाण जास्त आहे. बऱ्याच कुटूंबातील पुरूष हा दारू, गांजा, तंबाखु, खर्रा याच्या आहारी गेलेला आहे. दारू पिऊन घरच्या बाईला त्रास देणे, मारहाण करणे यामुळे घरी आल्यावरही त्यांना समाधान मिळत नाही. पर्यायाने शरीर कमजोर बनते. मी एकदा एका खेडयात गेले असता तिथे जवळपास १५—२० बायका होत्या त्या म्हणत होत्या बाई आम्हाला काही नको पण दारूबंदी करा तरच आमचे जीवन सुखी होईल यावरून महिलांना दारू पिणाऱ्या व्यक्तीचा किती त्रास होतो हे समजते.

व्यसनधिनतेमुळे पुरूषांचा खेळ आणि स्त्रियांचा छळ अशी अवस्था होते. स्त्रियांच्या वाटयाला आजार, मारहाणख उपेक्षा असे जीवन येते. गरीबी आणि खालावले आर्थिक परिस्थिती याचा मेळ घालत ती जीवन जगते.

**संघटनेचा अभाव:**

आर्थिक व सामाजिक विषमतेची दरी कमी करण्यासाठी प्रयत्न करणारी व कामगारावर होणाऱ्या अन्यायाला पायबंद घालण्याकरीता झटणारी एखादी कायम स्वरूपाची संघटना अस्तित्वात असल्याशिवाय समाजात स्थैर्य व शांतता नांदू शकत नाही. या विचारातून १९१९ मध्ये आंतरराष्ट्रीय श्रमसंघटनेची स्थापना करण्यात आली. स्वातंत्र्यपूर्व काळात शेतमजूराची संघटना बांधण्याकरीता वेळोवेळी प्रयत्न करण्यात आले त्या काळात किसनसभा आणि कृषकसभा या नावाने शेतमजूराच्या संघटना स्थापन झाल्या. ओरिसामध्ये श्रीमती राजमोहिनीदेवी तर महाराष्ट्रात गोदावरी परूळेकर यांनी आदिवासी लोकांना संघटित करण्यासाठी कार्य केले.

आपल्याकडे औद्योगिक कामगारांना संघटित करण्यासाठी जेवढे प्रयत्न करण्यात आले तेवढे शेतमजूराच्या बाबतीत करण्यात आले नाही म्हणून शेतमजूर महिला या असंघटीत क्षेत्रात आहे. तसेच त्यांच्यात स्थलांतरणाचे प्रमाण असल्यामुळे त्या संघटित होण्यात प्रयत्न करीत नाही.

कामगार कायद्यानुसार शेतमजूर स्त्री पुरूष एकाच प्रकारचे काम करीत असल्यास त्यांना समान दराने मजूरी दिली गेली पाहिजे परंतु शेतमजूर महिलांमध्ये मजूरीचा दर हा पुरूषांपेक्षा कमी आहे. पर्यायाने त्यांच्यात सौदाशक्ती कमी आहे. त्यामुळे आर्थिक पिळवूणक होते.

**शासनाच्या उपाययोजना:**

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना:—**

ही योजना सर्वात प्रथम महाराष्ट्र राज्याने सुरू केली तसेच १९७८ मध्ये रोजगार हमी कायदा तयार करणारे राज्यही महाराष्ट्रच योजनेचे रूपांतर कायद्याद केले. २ फेब्रुवारी २००६ ला प्रायोगिक तत्वावर १०० जिल्हयात हा कायदा लागू केला. २००८ ला संपूर्ण भारतात आणि २ ऑक्टोंबर २००१ मध्ये महात्मा गांधीच्या १४० व्या जयंती निमित्य महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी कायदा MANAREGA असे नाव देण्यात आले.

या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटूंबाला अकुशल क्षेत्रात १०० दिवस काम दिले जात होते. नवीन दुरूस्तीनुसार १५० दिवस काम दिले जाते. कामाचा रोज किती ठरवायचा हे केंद्रसरकारने राज्यसरकारवर सोपविले आहे. या कायद्याअंतर्गत एखाद्या शेतमजूराला महिनाभर काम मिळत नसेल, रोजगार नसेल तर ग्रामपंचायतीला अर्ज केल्यानंतर १५ दिवसाच्यसा आत रोजगार उपलब्ध करून देणे ग्रामपंचायतीला बंधनकारक असते. जर रोजगार

देत नसेल तर त्याला ७५ टक्के बेरोजगार भत्ता द्यावा लागतो.

या माध्यमातून लोकांच्या हातात पैसा जाते. वस्तुची मागणी वाढून पुरवठा वाढतो व रोजगार निर्मिती होते. या योजनअंतर्गत वृक्षारोपण करणे, नाल्या खोदणे, शेततळे बांधणे, सडकांची कामे, डोंगरदऱ्या चरी बांधणे, विहीरी खोदणे इ. कामे केली जाते. एकदंरीत पुर्नरूत्पादक संपत्ती तयार करणे कारण केवळ करापासून देशाची संपत्ती वाढत नाही.

राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वे ३६ ते ५१ यातील कलम ३७ नुसार लोकांच्या कल्याणासाठी त्यांच्या कल्याण्याच्या योजना आखाव्या हे उदिष्टे या योजनेचा महिला शेतमजूरांना लाभ झाला आहे.

**प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना:**

या योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या प्रतिवर्ष १२ रू. प्रिमीअम राशी बॅंकेत जमा करावी लागते या योजनेचा लाभ १८ ते ७० वर्ष वयोगटातील व्यक्तींना होतो. १२ रू. जमा करून दोन लाखापर्यंतचा विमा उतरवू शकते. त्यासाठी एल.आय.सी. साईटवर जाऊन रजिस्ट्रेशन करावे लागते. परंतु हे संगणक प्रणालीवर असल्यामुळे बऱ्याच महिला या बाबत अज्ञानी आहे. कधी कधी वेळेवर कामे होत नाही बराच वेळ बसून राहावे लागते नेटवर्क नसणे, सर्वव्हर डाऊन अशा समस्या येतात. एकूण आकडेवारी लक्षात घेता १५ कोटी लोकांनी रजिस्ट्रेशन केले असले तरी शेतमजूर महिलांचा आकडा नगण्य आहे.

**ई–श्रमिक कार्ड:**

ही योजना केंद्र सरकारने सुरू केली या कार्डसाठी ।बजपअम डवइपसमए बचत खाते, आधार कार्ड आवश्यक असते. १८ ते ४० वयोगटातील व्यक्तींना याचा लाभ होतो. साठ वर्षानंतर ३,००० रू. पेंशन मिळते. हे कार्ड व्दसपदम पध्दतीने तयार करावे लागते. योजना चांगली आहे, परंतु यासाठी मोबाईलची गरज असते. शेतमजूर महिलांजवळ अशाप्रकारचा मोबाईल नाही. आज मुलांचे शिक्षणही मोबाईलद्वारे होत असल्यामुळे पहिला प्रथम मुलांची गरज भागविते. प्रत्यक्ष पाहणीत असे आढळून आले की, शेतमजूर कुटूंबानी घरचे उत्पन्नाचे साधन असलेली गाय विकून मुलाला मोबाईल घेऊन दिला अशी परिस्थिती असेल तर महिला ई–श्रमिक कार्डची नोंदणी करण्यासाठी मोबाईल घेईल?

**निष्कर्ष:**

शेतमजूर महिला आणि शेतमजूर पुरूष यांच्या मजूरीदरात फरक आहे. शिक्षणाच्या बाबतीत आपण जरी शिकलो नाही तरी आपल्या मुलांनी मात्र शिकाव ही भावना दिसून आली. महिला शेतमजूराच्या कुटूंबाच्या गरजा मर्यादित असल्यामुळे त्यांची अपेक्षा मजूरीच्या स्वरूपात उत्पन्न वाढले पाहिजे ही असते. राजकीय क्षेत्रात शेतमजूर महिलांचा समावेश अत्यल्प आहे. त्यांच्यात आरोग्याच्या समस्या आहे. शेतमजूर महिलांचे उत्पन्न कमी तसेच अनिश्चित आणि चढउताराचे आहे त्यामुळे बेरोजगारी, आर्थिक पिळवणूक, खालावलेला राहणीमानाचा दर्जा ही परिस्थिती निर्देशनाचे आली. सरकारच्या अनेक आणि चांगल्या उपाययोजना असल्या तरी त्याचा फायदा पाहिजे त्या प्रमाणात झाला नाही. तारण ठेवायला कोणतीही मालमत्ता नसल्यामुळे त्यांना बॅंकेचे कर्ज घेता येत नाही म्हणून त्यांचे कुटूंब सावकारी कर्जाच्या विळख्यात सापडतात. शेतमजूर महिलामध्ये खर्रा खाण्याचे प्रमाण वाढत आहे. असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या तुलनेत शेतमजूर महिलांचे जीवन जास्त कष्टमय आहे. शेतमजूर महिलांमध्येही हुंडापध्दती आहे आपल्या ऐपतीप्रमाणे हुंडा देतात पैसे गेले तरी चालते पण मुलगी सुखात पडली पाहिजे. तिला माझ्यासारखे कष्ट नको ही भावना दिसून आली. शेतमजूर महिलांमध्ये आत्मविश्वास व आत्मसन्मान आहे.

**शिफारशी:**

शेतकरी व शेतमजूर यांच्या समस्या यावर सरकारनी तोडका काढायला पाहिजे. जसे की, जळगाव जिल्हयात महिला शेतमजूरांचे आंदोलन झाले. त्यांना १५० रू. रोजी हवी होती आणि शेतकऱ्यांना ती परवडत नव्हती कारण पैशाच्या मानानी त्यांचे काम निघत नव्हते अशा वेळेस सरकारने त्यांना कामाचे तास वेळेचे व श्रमाचे महत्व पटवून देण्यासाठी प्रशिक्षणाची व्यवस्था करणे.

शिक्षण प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे कारण आजही शेतीक्षेत्र मोठया प्रमाणावरआहे तरी शेतीची कामे कमी वेळात जास्त चांगली किंवा कोणत्या कामासाठी कोणते कौशलय वापरायचे याविषयी प्रशिक्षण दिल्या जात नाही याची गरज आहे.

सरकारच्या योजना कितीही चांगल्या असल्यल तरी त्यांच्यापर्यंत पोहचत नाही. तसेच कार्यालयीन कामकाज वेळेवर होत नाही, शिवाय शर्ती व अटी असतातच यासाठी गावपातळीवर समिती नेमून त्या योजनांचा त्यांना लाभ मिळवून द्यावा.

शेतमजूर महिलांमध्ये आरोग्यांचा समस्या असल्यामुळे जिल्हा तसेच तालुका पातळी त्यांच्यासाठी स्वतंत्र असा दवाखान्यात वार्ड असावा. कारण त्या खेडयात राहणाऱ्या असल्यामुळे त्यांना माहिती मिळत नाही.

महिला शेतमजुरांमध्ये स्थलांतरणाचे प्रमाण असल्यामुळे त्यांच्या मुलांमध्ये शिक्षणाविषयी उदासिनता आहे. महिला शेतमजूरांच्या मुलांसाठी तालुका पातळीवर किंवा जिल्हा पातळीवर वस्तीगृहाची सोय उपलब्ध करून देणे.

इतर महाविद्यालयाच्या तुलनेत कृषी महाविद्यालयाची संख्या कमी आहे ती वाढविणे.

उत्पादन खर्चावर आधारित शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा भावा द्यावा कारण शेतकऱ्यांचा शेतमजूर हा अविभाज्य घटक आहे. त्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढले तर शेतमजूराचेही उत्पन्न वाढेल.

एकंदरीत वरील सर्वेक्षणावरून लक्षात येते की, २१ व्या शतकात तंत्रज्ञानाचे युग असले तरी शेतमजूर महिलांच्या बाबतीत याचा उपयोग पाहिजे तसा होताना दिसून येत नाही. आजही अज्ञान, कमी उत्पन्न, खालावलेले आरोग्य, राहणीमानाचा निकृष्ठ दर्जा, आर्थिक पिळवणूक, कर्जाचा विळखा यासारख्या समस्या त्यांच्या आहेतच. शासकीय योजना कितीही चांगल्या असल्या तरी या योजनेचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहचत नाही. म्हणून हा भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्वपूर्ण घटक असला तरी उपेक्षितच आहे, हे वास्तव आहे.

**संदर्भ** :

श्रमाचे अर्थशास्त्र – प्रभाकर देशमुख
शोध अस्वस्थ कल्लोळाचा –वसुंधरा काशीकर – भागवत
लोकसत्ता, सकाळ
प्रत्यक्ष पाहिणी

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

**तक्ता क्र. १**
**वयोगटानुसार विभागणी**

| अ.क्र. | वयोगट | संख्या (लाखात) |
|---|---|---|
| १. | १०—१४ | ४.५५ |
| २. | १५—१९ | २०.३१ |
| ३. | २०—२४ | ३४.६२ |
| ४. | २५—२९ | ३९.६४ |
| ५. | ३०—३४ | ३८.६७ |
| ६. | ३५—३९ | ४०.८९ |
| ७. | ४०—४९ | ६२.६४ |
| ८. | ५०—५९ | ३७.१८ |
| ९. | ६०—६९ | २२.२१ |
| १०. | ७०—७९ | ४.९५ |
| ११. | ८० च्या वर | १.२१ |

**तक्ता क्र. २**
**वेतन दर**

| १ जानेवारी २०२१ | कुशल | अर्धकुशल | अकुशल |
|---|---|---|---|
| रोज<br>मासिक | ४६६.४६<br>१२१२८ | ४३६.६२<br>११३५२ | ३८१.५४<br>९९२० |
| १ जुलै २०२१ | | | |
| रोज<br>मासिक | ५०२.३८<br>१३०६२ | ४७२.५४<br>१२२८६ | ४४०.४२<br>११४५१ |

**तक्ता क्र. ३**
**दरमहा बचतीचे प्रमाणे (बचत गट)**

| अ.क्र. | रूपये | शेतमजूर संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ५० | ०३ | १२ |
| २. | १०० | १० | ४० |
| ३. | २०० | ८ | ३२ |
| ४. | बचत करीत नाही | ४ | १६ |
| | | २५ | १०० |

**तक्ता क. ४**

**शिक्षणाचे प्रमाण**

| शिक्षण | शे. महिला संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| प्राथमिक शिक्षण १—५ | ११ | ४४ |
| माध्यमिक शिक्षण ६—१० | १० | ४० |
| अशिक्षित | ४ | १६ |
| | २५ | १०० |

**तक्ता क. ५**

| उपचारासाठी जाता | शे. महिला संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| आशा वर्कर<br>प्राथमिक आरोग्य केंद्र<br>खाजगी दवाखाना | ३५<br>१०<br>५ | ७०<br>२०<br>१० |
| | ५० | १०० |